International Indexed, Refereed Research Journal, ISSN 2250-253x,(Print), E-ISSN 2320-544x, Issue4, Vol- I, April, 2013

शोध पत्र

# दिक्षाभमी ही सामाजिक, सांस्कतीक संगर भमी

* प्रा. डॉ. सुनिल आनंदराव राठोड़

* श्रीमती कोकाळाबाई गावंडे, महिला महाविद्यालय, दर्यापूर जि . अमरावती

***"चौदा ऑक्टोबर छप्पनला***
***पेटविल्या डॉ. आंबडकरांनी ज्ञानज्योती***
***ह्या घटनेची साक्षीदार***
***धम्म - दिक्षाभूमी होती . "***

नागपूर हे भारतातील मध्यवर्ती शहर महाराष्ट्राची उपराजधानी ! आंतरराष्ट्रीय विमानवाहतूक, राष्ट्रीय रेल्वेमार्ग, व महामार्गाने वेढलेले हे शहर दि. १४ ऑक्टोबर १९५६ ला प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबडकरांनी आपल्या लाखो जनसमुदायाच्या साक्षीने नागपुरला बैध्द धम्माची दीक्षा घेतली तेव्हापासून दीक्षाभूमीचा या क्षितीजावर तेजोमय उदय झाला. आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर या शहराची ओळख इ ाली. भारतातच उदयास आलेला व जगभर पावलेला बौध्द धम्म विश्वबंधुत्वाचा मार्ग ठरला. बुध्दांनी धम्माच्या रुपाने एक नवविचार जगाला दिला. वैदिक काळापासून चालत आलेली वर्णव्यवस्था अतिशय शोषणीय होती. ती मानवनिर्मित असल्यामुळे विशीष्ट वर्गाचा स्वार्थ साधणारी व आत्मकेंद्री होती. वर्णव्यवस्थेमध्ये कामाची विभागणी जाती निहाय करण्यात आल्यामुळे जातीव्यवस्थेचा उदय होत गेला. अशा प्रकारच्या व्यवस्थेला तथागत बुध्दांनी विरोध केला. त्यांनी समाजिक विषमता कमी करण्यासाठी लोकांना आपल्या कर्मावर विश्वास ठेवायला सांगितला. सत्कर्म केल्याने मानाचे जीवन आमुलाग्र बदलते असा त्यांना ठाम विश्वास होता. दैववादी दृष्टीकोन त्यांना मान्य नव्हता. ईश्वर पुजेऐवजी कार्यकुशलता व समाजसेवेला अनन्य साधारण महत्व दिले.

दीक्षाभूमी वर माथा टेकवून सदाचाराचा मार्ग बौध्दबांधवांनी अनुसरला. बुध्दांनी सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब केल्यास एका सुसंस्कृत, परिवर्तनशील, पुरोगामी समाजाचा उदय होईल. जेथे जातिभेद, असमानता, अन्याय, शोषण, वर्चस्व अशा कोणत्याही गोष्टींना थारा मिळणार नाही. दीक्षाभूमीने जगण्याची नवी दिशा दिली. माणसाला माणूसपण देऊन, समता स्वातंत्र्य आणि बंधुता हे न्यायाचे तत्व दिले. तेव्हापासून समाजात परिवर्तनाचे वारे वाहु लागले. दीक्षेपूर्वी हा समाज स्वतःचे अस्तित्व विसरुन जगत होता. प्रगतीच्या दिशा त्याला कळत नव्हत्या स्वतःची ओळख हरविल्यामुळे हा माणूस जगण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहत होता. अशा माणसामध्ये चैतन्य निर्माण करण्याचे काम धम्मदीक्षा देऊन डॉ. बाबासाहेब आंबडकरांनी केले. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्यानंतर विज्ञान - तंत्रज्ञानाची भाषा बोलली जावू लागली. तंत्रज्ञानाच्या सहय्याने हवेच्या तरंगावर माणसे संवाद साधायला लागली. भारतातला माणूस जगाच्या कोणत्याही काना-कोपऱ्यात संदेश साधू शकतो इतकी गतीमानता माणसाच्या आयुष्याला आली परंतु घरा-घरातला आणि शेजाऱ्यापाजाऱ्यासोबचा संदेश किंवा देवाणघेवाण कमी झाली. परदेशाचं आकर्षन वाढायला लागल आपल्या संस्कृतीचा व शेजारधर्माचा विसर पडायला लगला. शेतकऱ्याच्या मालाचे भाव बाजारपेठ ठरवू लागली. जन्मदात्याला पोटच्या मुलांना सांगावे लागते की, तुला लहानाचे मोठे केल. त्याची परतफेड कर म्हणून खरंच जागतिकीकरणाच्या या रणधुमाळीत या प्रश्नांची उत्तरे नाहीत. थोडक्यात भौतिक विकासाची गती वाढली मात्र माणूस माणूसपण हरवून बसला. अशा या रणरणत्या वातावरणात तथागताच्या लोकशाहीवादी विचारंची आठवण होते. बुध्दाने धम्मदीक्षेच्या वेळी भन्तेजींना उपदेश केला होता की, अत्तःदीप भवः स्वतः दीप व्हा ! स्वयं प्रकाशीत व्हा ! दुसऱ्या कोणाला शरण जावू नका. धम्म हेच सर्वांचे शरण स्थळ आहे. माणुस हा जन्मतः मुक्त आहे. जात, धर्म, प्रथा , परंपरा, गरीब , श्रीमंत , उच्च-निचता हे सर्व जन्मानंतर त्याच्यावर लादली जातात. त्यातून दुःख वाढते या दुःखाचे मुळ नष्ट करणारा सम्यक विचार तथागताने मांडला या विचाराने युद्ध टाळणारा जगाला संदेश दिला बुध्दाचा हा विचार जगात शांतता प्रस्थापित करणारा ठरला.

या बुध्दविचाराची संपूर्ण मानवजातीला कालही होती आजही आहे आणि उद्याही राहील असा विश्वव्यापी विचार डॉ. बाबासाहेब आंबडकरांनी अंगीकरला व १४ ऑक्टोबर १९५६ त्याच धम्माची दीक्षाभूमीवरुन शोषितांना दीक्षा दिली. लाखो लोकांनी बुध्द धम्म स्विकारला. ही अहिंसक क्रांती अव्दितीयच ठरली.

धर्माच्या नावावर अनेक कलह पहावयास मिळतात. "धर्म ही अफूची गोळी आहे" 2 असे मार्क्स संबोधतात. त्यामुळे समाजमन अस्वास्थ होते.

"धर्माचे मुख्य प्रयोजन माणुस घडविणे, माणुस वाचविणे होय परंतु अलिकडे धर्माच्या नावावर दंगली उसळतात. जालपोळ होते, हल्ले होतात तिर्थयात्रा, धर्मस्थळे, पुतळे, कुंभमेळे इत्यादी उत्सव आयोजित करुन लोकांमध्ये अंधश्रध्दा निर्माण केली जाते." 3 एक प्रकारचा चंगळवाद यातुन निर्माण होतो. यापेक्षा विज्ञान मेळे भरवून लोकांना नवनवीन माहिती व तंत्रज्ञानाची जर ओळख करुन दिली तर संपूर्ण मानवजातीच्या उत्कर्षाचे मार्ग मोकळे होतील. शोषणसत्ता गडगडली जाऊन मानवी मने मुक्त होतील. उन्नतीची झेप घेण्यास आकाश मोकळे होईल. भारताची भूमी हिनभूमी न राहता ती क्रातीभूमी होईल. असा विचार सांप्रत काळात नागपूरची दीक्षाभूमी देण्याचे कार्य करीत आहे. या कार्याला तोड नाही. म्हणूनच

जागतिकीकरणाच्या आजच्या काळात महसत्तेचे मनोरे खचू पाहत आहेत. ही तटबंदी आणखी मजबूत करण्यासाठी दीक्षाभूमी ही जागतिक स्तरावरील विचारसंसद होईल यात शंका नाही.

कोणत्याही क्षेत्रातील यश हे जादुसारखे मिळत नाही. त्यासाठी वर्षानुवर्षे जिद्दीने, चिकाटीने अविश्रांत धडपड करावी लागते. उदा. रोमसारखी प्राचीन शहरे, ताजमहल सारखे देखने वास्तुशिल्प डोंगर तयार करुन निर्माण केलेले वेरुळची लेणी म्हणजे माणसाच्या जिद्दीची, चिकाटीची व सततोद्योगाची चिरंतन प्रतीके व प्रेरक खूणाच आहेत. "भारताच्या प्राचीन इतिहासाचे सोनेरी पान उलटले तर, येथे, सिंधु, द्रविड, गोंड व नागवंशीय संस्कृती मोठ्या डौलाने नांदत होत्या परंतु आर्य संस्कृतीच्या आक्रमणानंतर इथल लोकशाही युक्त मातृसत्ताक गणराज्याचा त्यांनी गळा घोटला आणि वर्णव्यवस्था निर्माण केली. तथागत गैतम बुध्दाच्या विज्ञानवादी व मानवतावादी तत्वज्ञानाच्या बळावर ज्यांना शुद्र, गुलाम म्हणून वागविले त्यांना एकसंघ करुन, गणराज्य प्रस्तापित केले." 4

म. फुले म्हणतात, आकाशात रात्रंदिवस एकच चंद्र भ्रमण करतो. समुद्रात भरती-ओहटी निर्माण करतो. समुद्राचे पाणी त्यातील क्षारांसह तळातून हलवितो. तेच पाणी ढगांच्या रुपाने वर जाते आणि पावसाच्या रुपाने गोड होऊन खाली येते, असा एकच चंद्र जर सर्वांना समान सुख देत असेल तर फक्त माणसासाठीच वेगळे धर्म का ? असा प्रश्न ते उपस्थित करतात. माणूस विचार प्रक्रिया थांबवून जेव्हा बुध्दीहनतेचे, प्रदर्शन करतो. अशाचा ते खरपुस समाचार घेतात. तथागत बुध्द म्हणतात, माणसाने भूतकाळ विसरु नये पण त्यात गुंतूनही पडू नये. स्वप्ने जरुर पहावेत, मात्र भविष्यकाळावर फार अवलंबून वर्तमानाची साथ सोडू नये. खरे म्हणजे तूम्ही वर्तमानावरच अधिक लक्ष केंद्रीत केले पाहिजे. थोडक्यात माणसाने अष्ठावधानी राहुन आपला कार्यभाग साधला पाहिजे व त्याचबरोबर जनकल्याणाचाही विचार त्याने केला पाहिजे.

**निष्कर्ष :-**

१) धर्म, रुढी, परंपरा, आत्मा आणि परमात्मावादी धोरमांचा त्याग करण्यास दीक्षाभूमी प्रेरित करते.

२) बौध्द विचारात आलेली जळमटे प्रज्ञेच्या प्रयत्नाने दूर करण्यासाठी व मानवतेचा संदेश देण्यासाठी दीक्षाभूमी कटिबध्द आहे.

३) मिथ्याधारणा आणि चुकीच्या संकल्पना दीक्षाभूमीच्या विचारकक्षेपासून दूर पळतात.

**संदर्भ ग्रंथ**


१) आंबेडकर भीमराव रावजी , 'क्रांती प्रतिक्रांती', युगसाक्षी प्रकाशन , नागपुर, प्रथम आवृत्ती २०१२

२) जाधव, रा.ग. 'निळी पहाट', मराठी दलित साहित्याची मीमांसा श्रीविद्या प्रकाशन ,पुणे, चतुर्थ आवृत्ती १९९५

३) भाळे भाष्कर लक्ष्मण , 'संदर्भ दलित चळवळीचा', बजाज प्रकाशन, अमरावती, प्रथम आवृत्ती २००८

४) मोकाशी डॉ. मधुकर, 'ग्रामीण दलित साहित्य चळवळ आणि समीक्षा', स्नेहवर्धन प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती २००९